**ठळक बातम्या**

- महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायचा उद्या शेवटचा दिवस

- अरावली टेकड्यांच्या नव्या व्याख्येला स्थगिती देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

- तिन्ही सैन्य दलांसाठी ७९ हजार कोटी रुपयांच्या शस्त्र खरेदीला मान्यता

**आणि**

- फिडे जागतिक रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत कोनेरु हम्पी आणि अर्जुन एरिगसीला कांस्य पदक

**<><><><><>**

राज्यात महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासनाची आणि राजकीय पक्षांची तयारी जोरात सुरू आहे. उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस असल्यामुळे राज्यभरात आज अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी झाली. मुंबईसाठी काँग्रेसने ८७ उमेदवारांची तर राष्ट्रवादी काँग्रेसने ३७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आज सात उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. काँग्रेससोबत निवडणूक लढवत असलेल्या राष्ट्रीय समाज पक्षानं मंबईसाठी ६ उमेदवार आज जाहीर केले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मुंबई अध्यक्ष राखी जाधव यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत भाजपामधे प्रवेश केला. **मनसे**ने आपल्या उमेदवारांना एबी फॉर्म द्यायला आज सुरूवात केली. त्याआधी राज ठाकरे यांनी एका बैठकीत पदाधिकाऱ्यांना संबोधित केलं.

**ठाणे** महानगरपालिका निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढवणार असल्याचं काँग्रेस नेते विक्रांत चव्हाण यांनी आज माध्यमांना सांगितलं.

**पिंपरी** चिंचवडप्रमाणे पुण्यात शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालचे पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढवणार आहेत, अशी घोषणा अजित पवार यांनी काल केली. याला आमदार रोहित पवार यांनी आज दुजोरा दिला. दुसरीकडे पुण्यासाठी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, मनसे आणि वंचित बहुजन आघाडी हे एकत्र निवडणूक लढणार आहेत. पण पिंपरी चिंचवडमधे वंचित बहुजन आघाडी स्वतंत्र लढणार

आहे. पुणे महापालिकेची निवडणूक भाजपा, शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महायुती म्हणून लढवत असून मित्र पक्षांना सन्मानजनक जागा देण्यात येतील भाजपाचे गणेश बिडकर यांनी आज पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेची शिवसेना एकट्यानं लढवणार असल्याची घोषणा मंत्री शंभुराज देसाई यांनी आज केली. महायुतीत सन्मानजनक जागा न मिळाल्यानं हा निर्णय घेतल्याच ते म्हणाले.

<><><><><>

अरावली डोंगररांगांच्या नव्या व्याख्येला स्थगिती देण्याचा निर्णय आज सर्वोच्च न्यायालयाने दिला. अरावली पर्वत रांगांच्या नव्या व्याख्येवरून पर्यावरण तज्ज्ञ आणि सामाजिक संघटनांनी व्यक्त केलेल्या चिंतेची सर्वोच्च न्यायालयानं दखल घेतली. अरावली टेकड्यांच्या नव्या व्याख्येबाबत काही गोष्टी स्पष्ट करणं आवश्यक आहे, आधीच्या समितीच्या शिफारशींची पडताळणी करण्यासाठी एक समिती स्थापन केली जाईल, ज्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांचाही समावेश असेल असं न्यायालयानं सांगितलं. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती एजी मसीह आणि जे के महेश्वरी यांच्या पीठासमोर सुनावणी झाली.

अरावली पर्वत रांगांच्या संदर्भातल्या स्वतःच्या आदेशाला दिलेली स्थगिती आणि या बाबींच्या अभ्यासासाठी नवी समिती नेमण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचं केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामानबदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी स्वागत केलं आहे.

<><><><><>

उन्नाव बलात्कार प्रकरणातला दोषी कुलदीप सेंगर याच्या जन्मठेपेला स्थगिती देण्याचा दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेश आज सर्वाेच्च न्यायालयाने रोखून ठेवला. याबाबतीतल्या इतर कायदेशीर बाबींवर विचार करण्यासाठी चार आठवड्यांनी सुनावणी घेण्यात येईल, असंही न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

संरक्षणाखात्यासाठी विविध शस्त्र आणि यंत्रसामुग्री खरेदी करण्याच्या गरजेला संरक्षण अधिग्रहण मंडळाने स्वीकृती दिली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्ली इथं झालेल्या बैठकीत हा प्रस्ताव मंजूर झाला. तीनही

सेनादलांसाठीच्या मिळून आवश्यक सामग्रीसाठी एकोणऐंशी हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यात लांब पल्ल्याचा प्रक्षेपक पीनाक साठीची स्फोटकं, कमी वजनाची रडार्स, ड्रोन शोधक यंत्रणा. उच्च तरंग लहरींवर चालणारे रेडियो संच, विमानांच्या उड्डाण आणि अवतरणाच्या वेळी लागणारी रेकॉर्डिंग यंत्रणा, अशा अत्याधुनिक उपकरणांचा आणि यंत्रसामुग्रीचा समावेश आहे.

**<><><><><>**

विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी केंद्र सरकारनं गेल्या वर्षात विविध उपक्रम राबवले आहेत. हे वर्ष भारतासाठी संरक्षणदृष्ट्या महत्त्वाचं ठरलं. ऐकुया संरक्षण क्षेत्रातल्या भारताच्या आत्मनिर्भरता आणि सामर्थ्याविषयी....

----------व्हीसी----------

*(२०२५ हे वर्ष भारताच्या संरक्षण क्षेत्रातल्या आत्मनिर्भरतेचं आणि सामर्थ्याचं वर्ष म्हणून ओळखलं गेलं. मेक इन इंडिया म्हणजेच स्वदेशी बनावटीच्या संरक्षण उत्पादन क्षेत्राने गेल्या २०१४मध्ये ४० हजार कोटींपासून ते यंदा १ कोटी ५४ लाख रुपयांपेक्षा जास्त पल्ला गाठला आहे. जागतिक पातळीवर संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून भारताच्या उदयाचं हे प्रतीक आहे. संरक्षणासाठीच्या आर्थिक तरतुदींमध्येही गेल्या अकरा वर्षांत वाढ झाली आहे. २०१३-१४मध्ये असलेल्या २ लाख ५३ हजार कोटी रुपयांच्या तुलनेने ही तरतूद यंदा ६ लाख ८१ हजार कोटी इतकी वाढली आहे. भारत आता अमेरिका, फ्रान्स आणि आर्मेनियासह १०० हून अधिक देशांना संरक्षण उपकरणांची निर्यात करतो. यंदा सैन्य दलांची युद्ध सज्जता वाढवण्यासाठी अनेक करार झाले तसंच खरेदी प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. तसंच, स्वदेशी बनावटीच्या रायफली, युद्धनौका, पाणबुड्या, क्षेपणास्त्र, युद्धाशी संबंधित प्रणाली यांच्या यशस्वी चाचण्याही करण्यात आल्या. सीमा सुरक्षा दलाने यंदा भारतातलं पहिलं ड्रोन युद्ध विद्यालय सुरू केलं.)*

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू  आज जमशेदपूर इथल्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या पंधराव्या पदवीदान संमारंभाला उपस्थित राहिल्या. शैक्षणिक संस्थांचे मूल्यमापन केवळ मानांकन आणि प्लेसमेंटच्या आधारावर करणं योग्य नाही असं त्यांनी यावेळी  सांगितलं.

बावीसाव्या पर्सी महा संथाली संमेलनाला त्यांनी आज संथाली भाषेत संबोधित केलं. संथाली भाषेतलं संविधान ओला चिकी लिपीत आणण्यासाठी घेतलेल्या परिश्रमांची यावेळी राष्ट्रपतींनी प्रशंसा केली. राष्ट्रपतीं कार्यालयाचं संकेतस्थळही या लिपीत तयार व्हावं अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**<><><><><>**

युवा पदवीधारकांनी तंत्रज्ञानाकडे उत्साहाने आणि नैतिक दक्षतेच्या भावनेने वळायला हवे असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी.पी, राधाकृष्णन यांनी केलं. ते पुद्दुचेरी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाला संबोधित करत होते. या वेळी उपराष्ट्रपतींनी विद्यापीठातल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्र केंद्र आणि १०० फूट ध्वजस्तंभाचं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळं गेल्या ११ वर्षात आसामसह ईशान्य भारतातल्या राज्यांचा अभूतपूर्व विकास झाला असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज नागाव इथं केलं. आसाममधल्या विविध प्रकल्पांचं उदघाटन करून आल्यानंतर ते नागाव इथं झालेल्या जनसभेला संबोधित करत होते.

**<><><><><>**

गेल्या आर्थिक वर्षात देशातल्या बँकांमधली अनुत्पादित कर्ज गेल्या अनेक दशकांच्या निचांकी पातळीवर, २ पूर्णांक २ टक्क्यावर पोहोचल्याची माहिती रिझर्व्ह बँकेनं दिली आहे. मार्च अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा बँकांच्या कामगिरीचा अहवाल रिझर्व्ह बँकेनं आज जाहीर केला. त्यात ही माहिती समोर आली आहे.

२०२४-२५ या आर्थिक वर्षांत बँकांचा ताळेबंद मजबूत होता तसंच थकित कर्जही कमी झालं. याकालावधीत बँकांकडून कर्ज वितरण आणि ठेवींमध्ये १० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली. या आर्थिक वर्षात बँकांचा नफा वाढला असला तरी त्या आधीच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत त्याचं प्रमाण कमी होतं.

सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांनी शाखा विस्तार केल्यानं बँकांच्या शाखांची संख्या २ टक्क्यांनी वाढली. त्याचवेळी ATM ची संख्या २ हजार ३६० नं कमी झाली. गेल्या आर्थिक वर्षाच्या अखेर देशात २ लाख ५१ हजार ५७ एटीएम कार्यरत होती.

**<><><><><>**

नेपाळमधे सार्वत्रिक निवडणुकीसाठी उपेंद्र यादव यांचा जनता समाजवादी पक्ष आणि महंत ठाकूर यांचा लोकतांत्रिक समाजवादी पक्ष एकत्र झाले आहेत. दोन्ही पक्षात मधेशी समाजाचं प्राबल्य असून त्यांच्या नेत्यांनी आज तसा  करार केला असून नवीन एकत्रित पक्षाचं नाव , चिन्ह इत्यादी बाबी अद्याप ठरलेल्या नाहीत.

<><><><><>

चीननं तैवान भोवती केलेल्या संयुक्त युद्धसरावाचा आज तैवाननं निषेध केला. आंतरराष्ट्रीय मानदंडांची पायमल्ली तसंच  लष्करी दहशत निर्माण करून शेजारच्या देशांना घाबरवण्याचे  चीनचे हे डावपेच आक्षेपार्ह असल्याचं तैवानच्या संरक्षण मंत्रालयानं समाज मध्यमावरच्या एका संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

रशियासोबतच युद्ध थांबवण्यासाठी अमेरिकनं युक्रेनला १५ वर्षांसाठी सुरक्षेची खात्री द्यायची तयारी दाखवली आहे. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी ही माहिती दिली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची काल फ्लोरिडामध्ये भेट घेतल्यावर ते बोलत होते. ही खात्री युक्रेनला देण्यासाठी अमेरिकन काँग्रेसची मंजुरी आवश्यक असेल. युक्रेननं ५० वर्षाच्या सुरक्षेची खात्री मागितली आहे. ट्रम्प आणि युरोपियन देशांचे नेते सुरक्षेच्या अटींना तयार झाले तर रशियासोबत चर्चा करू असं झेलेन्स्की म्हणाले. युद्ध थांबवण्यासाठी दोन महिन्यांनी शस्त्रसंधी आवश्यक असून डोनबास भागात मुक्त आर्थिक क्षेत्र निर्माण करण्यासाठी चर्चा सुरू आहेत.

<><><><><>

फिडे जागतिक रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेच्या महिला गटात भारताच्या कोनेरू हम्पी हिने कांस्यपदक पटकावलं असून खुल्या गटात अर्जुन एरिगसी यानेही कांस्य पदकाची कमाई केली आहे. रॅपिड प्रकारच्या बुद्धिबळ स्पर्धेत पदक जिंकणारा अर्जुन दुसरा भारतीय पुरुष खेळाडू ठरला आहे. यापूर्वी विश्वनाथन आनंद यांनी या स्पर्धेत पदकाची कमाई केली होती.

//<><><><><>//